| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.२३०७/२०१९ |
| सरकार –वि–दिलीप |
| निशाणी क्र. २० |

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची शपथेवर सरतपासणी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | श्रीमती स्वाती सुधाकर भरडे, |
| **वय** | : | ५१ वर्षे, |
| **धंदा** | : | सरकारी नोकरी, |
| **राहणार** | : | महाल, नागपूर |

**सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती अमृता सोले यांचेमार्फत–**

मी, दिनांक ०२.०६.२०२५ पासून अन्न व औषध प्रशासन, नागपूर येथे औषध निरिक्षक, म्हणून कार्यरत आहे. यापुर्वी मी ०२.०६.२०१६ ते १०.०८.२०२१ पर्यंत नागपूर येथे औषध निरीक्षक म्हणून सदर कार्यालयात कार्यरत होते. मधल्या काळात माझी बदली अमरावती येथे झाली होती.

२. सदर प्रकरणात मी माझा नियुक्ती आदेश दिनांक ३१.०५.२०१६ ची छायांकीत प्रत दाखल केली आहे. त्यास **आर्टीकल ए** देण्यात येते.

३. दि. 26/02/2018 रोजी आमच्या कार्यालयास गुप्त माहितीच्या मिळाली की, M/s. DGC Naturopathy Yog Treatment And Cancer Healing Center, 201, आशिष अपार्टमेंट, दुसरा मजला, प्लॉट नं. 17, गावंडे ले–आऊट, छत्रपती चौक जवळ, आयसीआयसीआय बँकेजवळ, नागपुर येथे अवैधरित्या औषधी उत्पादन सुरु आहे. म्हणून मी दि. 26/02/2018 रोजी श्री वि.आर.रवी, औषध निरिक्षक, नागपुर, श्री महेश गाडेकर, औषध निरिक्षक, नागपुर, श्री सतिश चव्हाण, औषध निरिक्षक, नागपुर व दोन पंचासमवेत सदर ठिकाणी अधिक तपास चौकशीसाठी भेट दिली असता तेथे उपस्थित व्यक्तीने त्यांची ओळख दिलीप

दामोदर डोणेकर, M/s. DGC Naturopathy Yog Treatment And Cancer Healing Center, 201, आशिष अपार्टमेंट, दुसरा मजला, प्लॉट नं. 17, गावंडे ले–आऊट, छत्रपती चौक जवळ, आयसीआयसीआय बँकेमागे, नागपुर या संस्थेचे मालक अशी करुन दिली.

४. सदर ठिकाणी कुठल्याही औषधी उत्पादनाकरिता लागणारे परवाने श्री दिलीप दामोदर डोणेकर यांचेकडे मंजुर नसल्याने तेथे उपलब्ध औषधी साठयाची नोंद फॉर्म–16 व पंचनाम्या अंतर्गत जप्त करण्यात आला. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. मी केलेला पंचनामा तोच असून त्यावर माझी, दोन पंचांची व माझ्या सोबत असलेले ईतर अधिकारी यांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी–१** देण्यात येते. आता मला फॉर्म–१६ ची कार्बनप्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी, दोन पंचांची व आरोपीची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी–२** देण्यात येते. सदर फॉर्म –१६ ची मुळप्रत ही आरोपी यांस देण्यात आली.

५. जप्ती वेळी पुर्वीच वेगळे काढुन ठेवण्यात आलेले 02 औषधी नमुने ची नोंद फॉर्म 17 अंतर्गत नोंदवुन आरोपीला फॉर्म 17 ची मुळ प्रत देण्यात आली व त्याची पोच घेण्यात आली. सदर औषधी नमुने चाचणी व विश्लेषणार्थ आरोपीकडुन घेण्यात आले. आता मला फॉर्म–१७ ची कार्बनप्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. तसेच मुळप्रत आरोपीला मिळाली असल्याबाबत त्याची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी–३** देण्यात येते.

६. सदर औषधी नमुने चाचणी व विश्लेषणार्थ घेतेवेळी आरोपी यांना सदर नमुने बाबत रोख रक्कम देऊ केली असता त्यांनी ती स्विकारण्यास नकार दिला व त्यामुळे सदर औषधांची नोंद फॉर्म 17 ए अंतर्गत नोंदवुन श्री डोणेकर यांना फॉर्म 17 ए ची मुळ प्रत देण्यात आली व त्याची पोच घेण्यात आली. आता मला फॉर्म–१७–ए ची कार्बनप्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी सही

आहे. तसेच मुळप्रत आरोपीला मिळाली असल्याबाबत त्याची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी–४** देण्यात येते.

७. सदर दोन औषधी नमुन्याची नोंद फॉर्म 18 ए अंतर्गत घेण्यात आली व ते चाचणीस्तव शासकीय विश्लेषक, अन्न व औषध प्रयोगशाळा, नागपुर येथे पाठविण्यात आले. आता मला दोन्ही फॉर्म–१८ ए च्या कार्यालयीन प्रती दाखविण्यात आल्या. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **निशाणी पी–५ व पी–६** देण्यात येते.

८. दि. 27/02/2018 रोजी आरोपीकडुन जप्त करण्यात आलेला औषधी साठा व इतर मुददेमालाबाबत सुरक्षा कोठडी मिळण्याबाबत मा. अतिरिक्त मुख्य दंडाधिकारी, नागपुर यांचेकडे अर्ज दाखल केला. सदर अर्ज Misc. Cr. Application No. 6795/2018 ची स्थळप्रत प्रकरणात दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी पी–७** देण्यात येते.

९. दि. 26/02/2018 रोजी आरोपीने त्यांचे पत्रासमवेत काही औषधांची खरेदी बिलांच्या प्रती व इतर कागदपत्रे सादर केले. सदर पत्राची मुळप्रत कागदपत्रांसह प्रकरणात दाखल केले आहे. मला सदर पत्र आता दाखविण्यात आले. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **निशाणी पी–८** देण्यात येते. सदर पत्रानुसार आरोपीने जप्त केलेल्या औषधी उत्पादक डोणेकर फार्मास्युटिकल, 31, निमनगर, इंदौर Manufacturing License No. 25D/61 या ठिकाणी उत्पादकाचा पत्ता हा आरोपीने स्वत:च्या मनाने नमुद केल्याचे सादर केले आहे. तसेच या पत्रात आरोपीने गो–विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार, नागपुर यांचेकडुन काही औषधी खरेदी करुन त्यावरचे लेबल काढुन स्वत:चे लेबल लावुन विक्री केल्याचे सादर केले आहे. सोबतच मे. श्रेयस आर्यु फार्मा, ए–15–3, एमआयडीसी, बुटीबोरी, नागपुर यांचेकडुन 1 CANFRE CAPSULE 2 AREHOID CAPLSULE व DHANVI HAIR OIL या ठिकाणी त्यांना 25D अंतर्गत उसनवार परवाने क्रमांक MH/NGP/AYU–102502–A मंजुरी दि. 24/01/2018, मुदत दि. 23/01/2023 या उत्पादकाकडुन कुठलेच उपरोक्त पाठ उत्पादन करुन घेतले नसल्याचे सादर केले आहे. दि.

26/02/2018 रोजी अन्न व औषध प्रशासन, इंदौर यांना औषधी उत्पादक डोणेकर फार्मास्युटिकल, 31, निमनगर, इंदौर Manufacturing License No. 25D/61 सदर औषधी उत्पादक या ठिकाणी कार्यरत असल्याबाबतची माहिती मिळण्याबाबत पत्र अनुज्ञप्तीप्राधीकरण, अन्न व औषध प्रशासन, नागपर यांनी दिले. दि. 15/03/2018 अन्वये जिल्हा आयुष अधिकारी, इंदौर यांचे पत्र या कार्यालयास प्राप्त दि. 20/03/2018. त्यात डोणेकर फार्मास्युटिकल, 31, निमनगर, इंदौर Manufacturing License No. 25D/61 असे परवाने सदर ठिकाणी मंजुर नसल्याबाबत कळविण्यात आले. सदर पत्र प्रकरणात दाखल केले आहे. आता मला सदर पत्राची मुळप्रत दाखविण्यात आली. त्यास **निशाणी पी–९** देण्यात येते.

१०. गो–विज्ञान अनुसंधान केंद्र, देवलापार, नागपुर यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी त्यांचे पत्र दि. 14/03/2018 सोबत सादर केलेल्या विक्री बिलांद्वारे आरोपीला औषधी विक्री केल्याबाबत कळविले आहे. आता मला सदर पत्राची मुळप्रत दाखविण्यात आली. त्यास **निशाणी पी–१०** देण्यात येते.

११. मे. श्रेयस आर्यु फार्मा, ए–15–3, एमआयडीसी, बुटीबोरी, नागपुर यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी त्यांचे पत्र दि. 03/03/2018 प्रमाणे 1) DHANVI HAIR OIL हे तेल त्यांना मंजुर असलेल्या पाठानुसार उत्पादन केले नसल्याचे कळविले. सदर पत्राची मुळप्रत मी प्रकरणात दाखल केली आहे. त्यास **निशाणी पी–११** देण्यात येते.

१२. सदर प्रकरणी दिनांक ०४.०६.२०१९ रोजी शासकीय विष्लेशक नागपूर यांना विश्लेशन अहवालाची प्रत मिळण्याबाबत पत्राद्वारे विनंती केली. सदर पत्राची मुळप्रत प्रकरणात दाखल आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी पी–१२** देण्यात येते. त्यापत्रानुसार दिनांक १३.०४.२०१८ व ११.०५.२०१८ रोजीचे दोन अहवाल प्राप्त झालेत. सदर अहवालाच्या मुळप्रती मी प्रकरणात दाखल केलेल्या आहेत. त्यांना अनुक्रमे **निशाणी पी–१३ व पी–१४** देण्यात येते.

१३. मी केलेल्या संपुर्ण तपासाअंतर्गत असे आढळुन आले आहे की, I) आरोपीने डॉ. डोणेकर आयुर्वेद प्रायवेट लिमिटेड, प्लॉट नं. 10/24, गोपाल नगर रोड, हनुमान मंदिर जवळ, नागपुर यांनी उसनवार परवाना मे. श्रेयस आर्यु फार्मा, ए–15–3, एमआयडीसी, बुटीबोरी, नागपुर यांचेकडुन पाठ उत्पादनाकरिता परवाने मंजुर असुन सुध्दा आरोपी प्रत्यक्ष स्वत: जप्तीचे ठिकाणी विविध औषधाचे उत्पादन करित होते व डोणेकर फार्मास्युटिकल, 31, निमनगर, इंदौर येथे उत्पादन केल्याचे भासवुन उत्पादन करित होता. II) आरोपी बाजारपेठेतुन विविध औषधी आणुन त्या बॉटलांवर स्वत:चे लेबल लावुन विना परवाने औषधी उत्पादन केल्याचे आढळुन आले आहे. III) उसनवार परवान्याचे मुळ उत्पादक मे. श्रेयस आर्यु फार्मा, ए–15–3, एमआयडीसी, बुटीबोरी, नागपुर हे असले तरी प्रत्यक्षात आरोपी हा या ठिकाणाहुन कोणत्याही औषधाचे उत्पादन न करता जप्तीच्या ठिकाणी उत्पादन करित होता. IV) आरोपी यास कोणत्याही प्रकारचे औषधामध्ये प्रॅक्टिस करण्याचे अधिकार नसतांना व कोणतीच वैध नोंदणी नसतांना स्वत: डॉक्टर असल्याचे भासवुन विना परवाना औषध उत्पादन करुन विक्री करित असल्याने औषधी व सौंदर्य प्रसाधने कायदा 1940 व त्याअंतर्गत नियम Section 18 सी विना परवाना औषधी उत्पादन केल्याबाबत खटला दाखल केला असुन सदर प्रकरणा अंतर्गत आरोपी 27 (b) (ii) अंतर्गत शिक्षेस पात्र आहे. आरोपीविरुध्द कारवाई होण्यास मी स्वत: निशाणी १ अन्वये तक्रार दाखल केली आहे. आरोपी आज कोर्टासमक्ष हजर आहे.

सरतपास पुर्ण

**उलट तपास दोषारोप निश्चीतीपर्यंत तहकुब**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2026.03.12 16:07:04 +0530

( **अनामिका दे. बोस** )
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक १२.०३.२०२६